संगमनेर नगरपालिका कला दा.ज.मालपाणी वाणिज्य आणि
ब.ना.सारडा विज्ञान महाविद्यालय , संगमनेर

## परीक्षा विभाग

## विद्यार्थ्यांसाठी ऑनलाईन परीक्षेच्या वेळापत्रका बाबत महत्वाची सूचना

दि. ०७.११.२०२०

शैक्षणिक वर्ष **२०१९-२०** मधील प्रथम ते अंतिमपूर्व परीक्षांचे सम व विषम सत्रातील विषयांसाठी अनुक्रमे श्रेणीसुधार व अनुशेषित ( Performance Improvement Examination & Backlog Examination) या परीक्षांचे आयोजन विद्यापीठ **परीपत्रक क्र. १२१/२०२० दि.५ नोव्हेंबर २०२० नुसार दि.०३/१२/२०२० ते दि.१६/१२/२०२०** या कालावधीत विद्यापीठामार्फत फक्त **ऑनलाईन पध्दतीनेच** परीक्षेचे आयोजन करण्यात येणार असून संबंधित परीक्षेचे वेळपत्रक विद्यापीठाच्या संकेतस्थळावर जाहीर होईल.

संबंधित विद्यार्थ्यांनी याची नोद घ्यावी.

सोबत :- विद्यापीठ परिपत्रक क्र. १२१/२०२० दि.५ नोव्हेंबर २०२०

PRINCIPAL
Sangamner Nagarpalika Arts,
D. J. Malpani Commerce &
B. N. Sarda Science College,
Sangamner (M. S.)

# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

## परिपत्रक क्र.१२१/२०२०

**विषय : शैक्षणिक वर्ष २०१९-२० मधील प्रथम ते अंतिम पूर्व परीक्षांचे सम व विषम सत्रातील विषयांसाठी अनुक्रमे श्रेणीसुधार व अनुशेषित (Performance Improvement Examination & Backlog Examination), बहि:स्थ अभ्यासक्रमातील प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांच्या तसेच क्लास इम्प्रुव्हमेंट परीक्षांचे आयोजन ऑनलाईन पध्दतीने दिनांक ०३ डिसेंबर, २०२० ते दिनांक १६ डिसेंबर, २०२० या कालावधीत करणेबाबत.**

कोविड-१९ च्या महामारीच्या अभूतपूर्व परिस्थितीमध्ये शासन निर्णय आणि विद्यापीठाच्या विविध अधिकार मंडळांनी निश्चित केलेल्या मार्गदर्शक तत्वानुसार शैक्षणिक वर्ष २०१९-२० मधील परीक्षा आवेदनपत्र दाखल केलेल्या विद्यार्थ्यांसाठी खाली निर्देशित परीक्षांचे आयोजन करण्यात येत आहे.

१. एप्रिल, २०२० मध्ये न होऊ शकलेल्या विषम सत्रातील अनुशेषित विषयांच्या प्रात्यक्षिक/मौखिक/प्रोजेक्ट/सेमिनार व इतर महाविद्यालयीन स्तरावरील परीक्षांचे आयोजन कोरोना प्रादुर्भावाच्या पार्श्वभूमीवर विद्यापीठाने पाठविलेल्या परिपत्रकांमधील (जसे पत्र क्र.परीक्षा/४१५, दिनांक १ जून, २०२०) सूचनांच्या आधारावर करण्यात यावे. महाविद्यालयातील शिक्षकांनी त्यांच्या बीसीयुडी लॉगीन मधून सर्व संबंधित विद्यार्थ्यांचे गुण विद्यापीठाच्या intmark.unipune.ac.in या लिंकचा उपयोग करुन दिनांक ३० नोव्हेंबर, २०२० पर्यंत नोंदवावेत.

२. अनुशेषित, श्रेणीसुधार, बहि:स्थ प्रथम वर्ष व क्लास इम्प्रुव्हमेंट मार्च/एप्रिल, २०२० परीक्षांसाठी (शैक्षणिक वर्ष २०१९-२०) परीक्षा आवेदन पत्र सादर केलेल्या प्रथम व अंतिमपूर्व अभ्यासक्रमांच्या विद्यार्थ्यांच्या विविध विषयांच्या परीक्षा फक्त ऑनलाईन पध्दतीने दिनांक ३ डिसेंबर, २०२० ते दिनांक १६ डिसेंबर, २०२० या कालावधीत घेण्यात येतील. या परीक्षांचे वेळापत्रक जाहीर करण्यात येईल.

ही परीक्षा ऑनलाईन पध्दतीने सकाळी १०.०० ते सायं. ६.०० या वेळेत घेण्यात येईल. ज्या विद्यार्थ्यांकडे मोबाईल, लॅपटॉप, कॉम्प्युटर किंवा टॅब यापैकी कुठलीही सुविधा ऑनलाईन परीक्षा देणेसाठी उपलब्ध नाही, त्यांनी आपापल्या महाविद्यालयात किंवा जवळच्या महाविद्यालयात जाऊन, त्या महाविद्यालयांकडे उपलब्ध संगणक कक्षातील सुविधा वापरुन संबंधित विषयांची ऑनलाईन पध्दतीने परीक्षा द्यावी.

मा.प्राचार्य/संचालक, सर्व संलग्नित महाविद्यालये/मान्यताप्राप्त परिसंस्था यांना विनंती करण्यात येते की, सदर परिपत्रकाचा आशय आपल्या महाविद्यालयातील सर्व शिक्षक, शिक्षकेतर सेवक, पालक व विद्यार्थी यांना आपल्या स्तरावरुन निदर्शनास आणून द्यावा.

(महेश काकडे)
संचालक
परीक्षा व मूल्यमापन मंडळ

संदर्भ : परीक्षा-समन्वय/ ४९२
दिनांक : ०५ नोव्हेंबर, २०२०

प्रति,

१. मा. प्राचार्य/संचालक
सर्व संलग्नित महाविद्यालये/मान्यताप्राप्त परिसंस्था,
पुणे, अहमदनगर, नाशिक जिल्हा